प्रकरण दुसरे

आगकरांचे राजकीय तत्त्वज्ञान

प्रकरण दुसरे

-: आगरकरांचे राजकीय तत्त्वज्ञान :-

जीवनकलहाचा सिध्दांत, प्रगतीचा सिध्दांत, धर्म, समाज व राजकारण याविषयीचे विचार :-

अर्वाचीन महाराष्ट्राच्या विचारविश्वाला नवी दिशा देण्यास ज्या महत्वपूर्ण व्यक्तीचा हातभार लागला त्यात आगरकर हे एक अलौकिक व्यक्तिमत्व होते. आगरकरांच्या विचारावर स्पेन्सर आणि मिल यांच्या तत्वज्ञानाचा खोल परिणाम झाला होता. समकालीन विचारवंतापेक्षा आगरकरांचे वेगळेपण त्यांच्या शास्त्रीय दृष्टीकोनातून होते. समाजाची उत्पत्ती, स्थिती आणि गती यांचा त्यांनी शास्त्रीय दृष्टीकोनातून अर्थ लावला आणि सर्व प्रक्रियांचा अभ्यास ऐतिहासिक संदर्भात केला.

वैचारिक प्रभाव :-

ग्लॅडस्टन, रिपन, ब्राईट, ब्रॅडलॉ, ह्यूम अशा उदारमतवादी मुत्सद्यांचे व चिंतकांचेआदर्श आगरकरांच्या डोळ्यापुढे होते. आपल्या देशाचे हित हे जगाच्या हिताशी सुसंवादी असले पाहीजे. त्यात मुलभूत विरोध असल्याचे कारण नाही. अखिल मानव जातीचे सुख आणि स्वास्थ हेच आपले अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. ते साध्य करुन घ्यावयाचे तर प्रथम राष्ट्र म्हणून जगात आपली प्रतिष्ठा राहिली पाहिजे. आधी जगणे आणि मग ध्येयसाधना हा न्याय व्यक्तीप्रमाणेच समाजालाही लागू पडतो त्यामुळे माणूस हा आगरकरांच्या समग्र विचारांचा मध्यबिंदू ठरला आहे.[१]

आगरकरांच्या समाजविचारात जीवन कलहाचे तत्व प्रधान होते. त्यांच्या मते या जीवन कलहातून माणसाचा विकास झालेला आहे. त्यामुळे आगरकरांच्या मते समाजाची रचना समजावून घ्यावयाची असेल तर जीवनकलहाची संकल्पना समजावून घेतली

पाहिजे. प्रगतीची संकल्पना ही मानवसापेक्ष आहे तर उत्क्रांतीची प्रक्रिया मानजातीपुरती मर्यादित नसून सार्वत्रिक आहे. सृष्टीत सर्वत्र चालू असलेला जीवनकलह आतापर्यंत उत्क्रांतीला पोषक ठरला आहे.

जीवनार्थ कलह व सुधारणा :-

गो.ग. आगरकर यांनी "**जीवनार्थ कलह व सुधारणा**" ह्या आपल्या लेखात असे मत व्यक्त केले आहे की,

सचेतन सृष्टीचे अवलोकन केले असता असे दिसून येईल की, तिच्या प्रसरणास किंवा परिणतीस जीवनार्थ कलह उपरिहार्य आहे. उंदराला साप, सापाला मोर व मोराला सिंह खाण्यास नेहमी टपलेला असल्यामुळे शिवाच्या संसारात अन्योन्य कलहाने जरी एकच गोंधळ करुन सोडीला आहे, तरी उंदीर, साप, मोर व सिंह यांच्याअंगी जे गुण अद्‌भूत झाले आहेत. ते त्या अन्योन्य कलहामुळे झाले आहे असे विचाराअंती दिसून येईल. हा कलह नसता तर, बिलेशयाला अव्दितीय खनिकसामर्थ्य, पन्नगाला विषकंठत्व आणि शिखीला ग्रीवादीर्धत्व व पंचाननाला मृगेंद्रत्व प्राप्त होते किंवा नाही याचा संशय आहे. प्रतिस्पर्धेमुळे एकाच जातीतील व्यक्ती उत्तरोत्तर अधिक चांगल्या होत जाऊन, कालांतराने साऱ्या जातीची सुधारणा होते इतकेच नाही, तर जातीजातीत उदरनिर्वाहासाठी जो रात्रदिवस संग्राम, चालला आहे, त्यामुळे त्यात गुंतलेल्या जीवांच्या मानसिक व शारिरीक शक्तीची परिणती होत जाते. या निर्वाहकदनांत जे प्राणी क्षीण व मंद असतात त्यांचा मागमूस नाहीसा होतो, व जे सामर्थ्यवान, चंचल असतात तेच मागे रातात. भक्ष्य आणि भक्षी यामध्ये अहोरात्र जे रण माजले आहे. त्यामुळे उभयतांचाही दर्शनेद्रिंये आणि चलनेंद्रिये अधिकाधिक कार्यक्षम होत आहेत आणि त्यांचे ज्ञानतंतू व मज्जातंतू सुदृढ होत जातात.[२]

आगरकरांच्या मते स्वत:च्या संरक्षणार्थ आणि उदरनिर्वाहार्थ जे सामर्थ्य प्राणी पैदा करतो त्याचा वापर तो इतर कामासाठीही करतो. तसे करण्यात आपले हित आहे हे

लक्षात येताच अनेक चांगली कामे तो करु लागतो. प्राणी जे करतात तेच कमी जास्त प्रमाणात माणसेही करतात. आज पृथ्वीवर जी मोठमोठी राष्ट्रे दृष्टीस पडत आहेत त्यांची निर्मीती जीवन कलहाशिवाय झालेली नाही. दुसऱ्यावर चाल करण्यासाठी मनुष्याने समुदाय बनविले. या समुदायात व जातीत त्याने श्रमसंयोगाने म्हणजे अनेक व्यक्तींनी समान हितासाठी एका विचाराने श्रम करण्यास सुरुवात केली. एका प्रकारच्या श्रमसंयोगातून साऱ्या प्रकारचे श्रमसंयोग निर्माण झाले. माणसाने जीवनकलहात अशा प्रकारे आपली सुधारणा घडवून आणली व समाजनिर्मित झाली.

आज हजारो वर्षे मनुष्यांच्या जाती–जातीत जो दारुण संग्राम माजून राहिला आहे, त्यापासून त्यास ज्या यातना भोगाव्या लागल्या असतील त्या कितीही अतर्क्य किंवा निर्वाच्य असल्या तरी तशा प्रकारच्या यातना भोगल्याशिवाय व अनेकांच्या प्राणांचा संहार झाल्याशिवाय आज जी सुधारणा दृष्टीस पडते आहे ती कधीही अस्तित्वात न येती, व सर्व पृथ्वी गिरिकंदराचा आश्रय करणाऱ्या व फलमुलांवर चरितार्थ चालविणाऱ्या नि:शक्त व निर्बुध्द मनुष्यांनी व्यापलेली असती, ही गोष्ट स्पष्टपणे लक्षात येणे फार अगत्याचे आहे.

तथापि याच विचारांबरोबर ही गोष्टही लक्षात ठेवली पाहिजे की, मारामाऱ्या, लढाया, उपवास, रक्तस्त्राव, लुटालूट वगैरे विपत्तीकारक वस्तूशिवाय जरी आमच्या मानसिक व शारिरीक शक्तींचा विकास झाला नसता, मोठमोठी राष्ट्रे अस्तित्वात आली नसती आणि आज जी सुधारणा त्यांत दृष्टीस पडत आहे ती कधीही उद्‌भवली नसती, तरी ही सुधारणा उत्तरोत्तर वृध्दिंगत होण्यास अशाच विपत्तीकारक वस्तूंची सर्वकाळ अपेक्षा आहे, असे नाही. या अपरिहार्य प्राथमिक संग्रामामुळे जे गुण अस्तित्वात आले आहेत त्यांचा उपयोग विपत्तीकारक कामाकडे न करता सत्कार्याकडे करणे शक्य आहे आणि अलिकडे तशा प्रकारचे उपयोगांतर सर्वच दृष्टीस पडू लागले आहे. तात्पर्य, वन्यावस्थेतील मारांमाऱ्यापासून उत्पन्न झालेल्या क्रोर्यादि समाज विघातक गुणांचा लय होत जाऊन

सद्यतादि समाज-हितोत्कर्षकारक गुणांचा विकास होत जाणे, हाच मनुष्यजातीच्या प्रसरणाचा किंवा परिणतीचा नियम, असे म्हणण्यास हरकत नाही.

आगरकरांची ही दृष्टी विलक्षण आहे. जीवनातील विसंगती, अधोगती, क्रौर्य पाहूनही त्यांची मांगल्यावरची निष्ठा नष्ट होत नाही. "**बळी तो कान पिळी**" हे तुणतुणे ते वाजवीत नाहीत. आगरकर हे नैतिक नियमांचे पुरस्कर्ते होते. समाजनिर्मितीसाठी कलहाबरोबरच ते परस्पर सहकार्यही आवश्यक असल्याचे मानतात.

माणसामध्ये सुष्ट व दुष्ट, विवेकी आणि अविवेकी विचार अशी व्दंदे निसर्गदत्त आहेत असे आगरकर मानतात. सृष्टीच्या विकासाबरोबर या व्दंव्दांचाही विकास होत जातो. या व्दंव्दांना आगरकर मोकळेपणाने सामोरे जातात, त्यातील विकासक्रम पाहतात. या विकास क्रमात त्यांना मानवाने केलेल्या प्रगतीचे सूत्र सापडते. या प्रगतीचा संकल्पकर्ता माणूस आहे. या प्रगतीचा वाहकही माणूस आहे याचा त्यांना बोध होतो. म्हणूनच माणूस हा सुरुवातीस सृष्टीचा दास असला तरी उत्तरोत्तर तो त्या सृष्टीचा स्वामी बनत चालल्याचा साक्षात्कार आगरकरांना होतो. माणसाच्या या सिध्दीचे आगरकर स्वागत करतात. इतकेच नव्हे तर त्यांचे सर्व श्रेयही ते या माणसालाच देतात. विश्व हे नित्य परिवर्तनशील आहे या परिवर्तनाचा कर्ता माणूसच आहे ही आगरकरांची धारणा होती.

समाज हा नेहमी गतीमान असतो, कारण एकही सचेतन वस्तू स्थिर नाही. त्यात प्रत्येक क्षणास प्रत्येकी दृश्य व अदृश्य फेरफार होतात हे कळून येणे फार महत्वाचे आहे. सामाजिक स्थित्यंतरे जर निसर्गनियमांप्रमाणे अपरिहार्य असतील तर ती आपणास कशी सुखकारक होतील हे पाहणे प्रत्येक विचारी माणसाचे कर्तव्य आहे. म्हणून आपण आपणास अनुकूल अशा स्थित्यंतरास साह्यभूत झाले पाहिजे.[३] त्यामुळे जीवनाचा विकास हा जसा कलहातून होतो तसा विचारांचा विकासही कलहातूनच होत असतो अशी एक

व्दंव्दात्मक दृष्टीही आगरकरांनी आपल्या चिंतनात स्पष्ट केली आहे. विकासाच्या अशाच एका टप्यावर धर्मविचार उदयास आला असे आगरकर म्हणतात.

आगरकरांचा अज्ञेयवाद :-

आगरकर ज्याप्रमाणे विवेकवादाचे पुरस्कर्ते होते त्याचप्रमाणे ते अज्ञेयवादाचेही पुरस्कर्ते होते. स्पेन्सर यांनी विश्वाच्या आदिकारणाला अज्ञेय असे म्हटले आहे. विश्वाला, सचेतन व अचेतन सृष्टीला खरेखरे अस्तित्व आहे. अज्ञेय अशा आदिकारणाचाच तो अविष्कार आहे. ज्ञेय आणि अज्ञेय यांचा संबंध कसा जडला हे सांगता येत नाही. पण विश्वाचे व्यापार काही नियमांनी चालतात आणि हे नियम मनुष्याला शोधून काढता येतात असा त्यांचा विश्वास होता म्हणूनच स्पेन्सर यांनी आपल्या ज्ञेय विचारात नैसर्गिक व सामाजिक शास्त्रांतील शोधांचे व सिध्दांतांचे जागोजाग आधार घेतले आहेत. आगरकरांची विचारसरणीही हुबेहुब यासारखीच आहे.

आगरकरांचे असे मत होते की, श्रध्दा व विवेक यांच्यात आजच्या जमान्यात संघर्ष अपरिहार्य आहे. कारण श्रध्दा धर्मावर आधारलेली असते. जसजसा लोकांच्या विचारांचा विकास होत जाईल. समाजात सुधारणा होत जाईल तसतसे या आचारांचे अनौचित्य लोकांच्या लक्षात येईल. म्हणून अंतिमत: श्रध्दा व विवेक यांच्या संघर्षात विवेकाचाच विजय होणार आहे. विवेक पूर्ण जागृत होईपर्यंत श्रध्देचा पगडा असतो. प्रत्येक तत्त्वास विवेकाच्या आचेवर झाळून घेणे महत्वाचे असते. आगरकरांची अशी खात्री होती की विकासाच्या प्रक्रियेतून विश्वासाकडून विवेकाकडे अधिकारांतून होणे अपरिहार्य आहे.[४]

जे प्रश्न कधीच सुटण्याचा संभव नाही किंवा ज्यांची बिनतोड पुराव्यानिशी उत्तरे देताच येणार नाहीत. त्यांचा निष्कारण काथ्याकूट करीत बसू नये असे स्पेन्सरप्रमाणेच आगरकरांचेही मत होते.[५] तत्कालीन समाजातील दोषांवर आगरकरांनी कठोर प्रहार केले आणि त्यांना ज्या सुधारणा ईष्ट आणि आवश्यक वाटल्या त्यांचे त्यांनी जोरदार समर्थने

केले. ईष्ट असेल ते बोलणार आणि शक्य असेल ते करणार हा आगरकरांचा बाणा त्यांच्या विवेकवादी व इहवादी विचारसरणीतून निष्पन्न झाला आहे.

"धर्मविचारांची उन्नत्तावस्था" या निबंधात आगरकरांनी अज्ञेयवाद हा धर्मविचारातला शेवटचा सिध्दांत होय, असे सत्यसंशोधनाची कसोटी लावून ठरविले आहे.[६]

धर्मविषयक विचार :-

मनुष्याच्या ज्या अनेक मनोवृत्ती आहेत त्यापैकीच धर्मकल्पना ही एक आहे. ज्याप्रमाणे इतर वृत्ती किंवा त्यांची बीजे त्याच्या प्रकृतीशी खिळलेली आहेत त्याप्रमाणेच धर्मकल्पनाही त्याचे मनात फार प्राचीन कालापासून वास करीत आहे, किंबहूना ज्या वेळेस मनुष्याची उत्पत्ती झाली त्याच वेळेस तिचे बी त्याच्या मेंदूत लावले गेले असे म्हणण्यास हरकत नाही. मनुष्याच्या इतर वृत्तीप्रमाणे त्यांच्या या वृत्तीतही फेरफार व सुधारणा होत चालली आहे. दोन हजार वर्षापूर्वी आमच्या ज्या ज्या धर्मकल्पना होत्या त्यात आणि आमच्या सांप्रतच्या धर्मकल्पनात जमीन अस्मानांचे अंतर पडले आहे व कालांतराने आणखीही पडणार आहे. तात्पर्य, हा सारा प्रकार मनुष्याच्या इतर मनोवृत्तीप्रमाणेच घडून आला आहे. तथापि येवढ्यावरुन त्याच्या इतर वृत्ती आणि त्याची ही वृत्ती एकाच सपाटीवर ठेवता कामा नये. वृत्ती-वृत्तीत पुष्कळ भेद आहे. काही वृत्ती अत्यंत क्षीण आहेत व काही अतोनात प्रबल आहेत. काहींचा परिणाम फक्त क्षणिक असतो व काहींचा आयुष्यभर टिकतो. मनुष्याच्या धर्म कल्पनेचा या दुसऱ्या प्रकारच्या मनोवृत्तीत समावेश होतो. एका दृष्टीने हिच्याइतकी प्रबल दुसरी मनोवृत्ती नाही असे म्हटले तरी चालेल. हिच्या योगाने मनुष्य जसा सद्‌गुणी तसा दुर्गुणीही होतो. मनुष्यामनुष्यात सख्य उत्पन्न करण्यास जशी ही कारण होते तशीच त्यांचे वैमनस्यासही कारण होते. हिच्या योगाने जगाचे जितके हित झाले आहे. तितकेच अहितही झाले आहे असे दाखविता येईल. कुटुंबात आणि समाजात एकी राखण्याचे हिच्या अंगी जितके सामर्थ्य आहे तितके

त्यात दुही माजविण्याचेही आहे. मनुष्यांना प्रशस्त सत्कर्मे करण्यास हिने जितके प्रवृत्त केले आहे, तितकेच साहसाची दुष्ट कृत्ये करण्यासही प्रवृत्त केले आहे. सारांश, हिचे स्वरुप जितके मनोहारी तितकेच बीभत्सही आहे. हिचा प्रभाव जितका कल्याणप्रद तितकाच अहितकारक आहे, आणि हिने जितके पुण्याला तितकेच पापालाही उत्तेजन दिले आहे.![७]

अशा प्रकारे धर्मकल्पना व धर्मसंस्थाकडे पाहण्याची आगरकरांची दृष्टी ही पूर्णत: ऐतिहासिक व समाजशास्त्रीय स्वरुपाची आहे. आगरकरांच्या मते, धर्माचा उदय हा समाज घटनेच्या प्रक्रियेशी निगडीत आहे. माणसाच्या या विकास प्रवासात ज्या अनेकविध सामाजिक वृत्ती व संस्था उदयास येतात तशाच धर्मवृत्ती व संस्था याही होत. परिणामत: धर्म संस्था व धर्मवृत्ती ही दैवी नसून मानवी आहे. धर्मसंस्थाही मानवी असल्यानेच मनुष्याच्या इतर कोणत्याही वृत्ती व संस्थाप्रमाणेच ती टीकेला, चिकित्सेला व सुधारणेला पात्र आहे असे आगरकर मानतात आणि त्या दृष्टीने ते धर्माची चिकित्सा करतात. आगरकरांनी जी धर्म चिकित्सा केली ती कोणत्याही विविक्षित धर्मपंथाची चिकित्सा नव्हती. तर ती एकूण धर्मकल्पनेची व धर्मसंस्थेची चिकित्सा होती. धर्मकल्पनेची अशी चिकित्सा करताना त्यांनी प्रचलित धर्मपंथाची व विशेषत: हिंदू धर्माची परखड समीक्षा केली हे खरे पण ती अनुषंगिक होती. आधी धर्मवृत्तीची समीक्षा आणि मग हिंदू धर्माची वा इतर धर्माची चिकित्सा असा क्रम त्यांच्या लेखनात आहे आणि तो ध्यानात येणे हे जरुरीचे आहे.

मनुष्याची पशुतुल्य अवस्था सुटून तो थोडा विचार करु लागला की त्याच्या मनात भोवतालच्या जगाबद्दल कुतूहल निर्माण होते. सृष्टीक्रमातील स्थित्यंतरे, पदार्थांचे गुणधर्म, प्राण्यांचे स्वभावविशेष यांचा त्याला नीट बोध होत नाही व तो भांबावून जातो. वादळ, वीज, पूर, दुष्काळ यांच्यापासून व व्याघ्रसिंहादी वन्य पशूपासून आपला बचाव कसा करावा असा त्याला प्रश्न पडतो. जड पदार्थ, वनस्पती, आणि प्राणी यांच्या ठिकाणी

आपल्यासारखेच मनोविकार आहेत; आपल्याप्रमाणेच त्यांचे व्यापार सहेतुक आहेत; ज्या कारणांनी आपले मनोविकार प्रक्षुब्ध व संतुष्ट होतात त्याच कारणांनी त्यांचे मनोविकारही क्षुब्ध व संतुष्ट होत असतील असे त्याला वाटू लागते. साहजिकच आपल्यावर त्यांची अवकृपा न होता अनुग्रह व्हावा म्हणून तो त्याची आराधना करण्यास प्रवृत्त होतो. केवळ भव्य व उग्र वस्तूबद्दलच मनुष्याला भिती वाटते असे नाही; तर अज्ञान आणि अपरिचित वस्तू किंवा घटना बघूनही तो भयभीत होतो. यातूनच पदार्थपूजा, वनस्पतीपूजा आणि प्राणी पूजा अशा त्रिविध उपासना प्रचारात येतात. आपल्यापेक्षा बुध्दीने, बळाने, गुणवत्तेने आणि पराक्रमाने जे श्रेष्ठ असतात, त्यांच्याबद्दलही मनुष्याला आदर व भिती वाटते. त्यांच्या अंगी काही अतिमानुष दैवी शक्ती आहे असे मानून त्यांची जिवंतपणी व मरणोत्तर पूजा-अर्चा रुढ होते. श्रेष्टजन व पूर्वज यांच्या आराधनेतूनही धर्मभावनेचे पोषण होते. अशा प्रकारे अज्ञान, विस्मय आणि भिती यामधून सामान्यत: सर्वत्र धर्मकल्पनेचा उदय झाला आहे. आगरकर म्हणतात, **"या विश्वातील सचेतन व अचेतन अशी कोणतीच वस्तू स्थिर नाही."** हेच सत्य होय आणि ते एकदा कळून येणे आवश्यक आहे असे त्यांना वाटते. कारण "जगसारखे बदलत चालले आहे अशी खात्री झाल्याने विचारी मनुष्यास एवढाच विचार करता येतो की, ज्याअर्थी स्थित्यंतराचे रहाटगाडगे सतत फिरत राहणार, त्याच्या गतीस कोणीही प्रत्यवाय करु शकत नाही, त्या अर्थी जेणेकरुन त्याची गती आपणास सुखावह होईल असे वर्तन करणे आपल्या ताब्यात असल्यास निदान तसे तरी करावे म्हणजे खरे सुख मिळेल तस्मात आपणास अनुकूल अशा स्थित्यंतरास आपण सहाय्यभूत व्हावे हे आपणास योग्य आहे." असे आगरकर म्हणतात.[८]

धर्म आणि नीती यातील व्दैत उत्पन्न होण्यास परलोक, देवदेवता आणि भूतपिशाच्च वगैरे भ्रामक कल्पना कारण होतात व त्या भ्रामक आहेत अशी मनुष्याची खात्री झाली म्हणजे नीती तोच धर्म व धर्म तिच नीती अशी अवस्था प्राप्त होवून

सत्यनिष्ठा, न्यायप्रीती, परोपकार आणि शहाणपण या सद्‌गुणांची वृध्दी होऊन मनुष्ये स्वावलंबनाने आपला मार्ग आक्रमू लागतील. पूजा व प्रार्थना करण्यात मनुष्य परावलंबी होतो आणि सृष्टीतील निरनिराळ्या शक्तीची उपासना करुन तिच्यावर प्रभूत्व मिळविण्याचे प्रयत्न करु लागतो ही दास्यवृत्ती त्याने सोडून स्वावलंबी आणि "**अहंब्रम्हास्मि**" ही प्रभूत्वाची वृत्ती धारण केली पाहिजे.[९]

विशिष्ट धर्मकल्पना सर्व धर्माच्या व पंथाच्या लोकांना पटतीलच असे नाही; पण सर्वसामान्य नीतीतत्वांचे आवाहन सर्वांनाच होवू शकते. म्हणूनच धर्म श्रध्दा आणि नीती विचार यांची फारकत झाली पाहिजे असा आगरकरांचा आग्रह होता.

आगरकरांनी पूर्वजन्म, पूर्नजन्म या कल्पनांना सोडून दिल्यामुळे अर्थात त्यांचा धर्म म्हणजे "**मनुष्यतेचे ऐहिक सुखवर्धन**" हाच बनला हे साहजिकच आहे. याच धर्माचे ते आजन्म उपासक होते. ते एके ठिकाणी म्हणतात, "मनुष्यतेचे ऐहिक सुखवर्धन या भावी सार्वत्रिक धर्माची ज्यांनी दीक्षा घेतली असेल ते दुसऱ्यास सांगावे आणि तद्‌नुसार होईल तेवढे आचरण करावे, हेच त्यास उचित आहे." पण मनुष्यतेचे ऐहिक सुख यात अभिप्रेत नव्हता हे लक्षात ठेवले पाहिजे. परोपकार, सदाचार, सत्यनिष्ठा आणि आत्मसंयम यामुळे प्राप्त होणारी आत्मिक व बौध्दिक सुखे ही या ऐहिक सुखात अंतर्भूत होतात.[१०]

धर्मभावना ही मानवी मनाची एक नैसर्गिक प्रवृत्ती असल्याने तिचे आपल्या जीवनातून समूळ उच्चाटन होण्याची शक्यता पुष्कळच कमी आहे. पण धर्म ही यापुढे प्रत्येकाची खाजगी बाब रहिली पाहिजे. सामाजिक व्यवहारातील धर्माचे वर्चस्व झुगारुन दिले पाहिजे. आपल्या देशात अनेक धर्माचे, पंथाचे आणि जाती जमातीचे लोक आहेत; म्हणून धर्माच्या पायावर आपल्याला उदयाच्या भारताची उभारणी करता येणार नाही. "मनुष्या मनुष्यात प्रेमवृध्दी होवून त्यांनी एक दिलाने वागू लागण्यास त्यांचा धर्मभेद नित्य व्यवहारात दृष्टीस पडता उपयोगी नाही. मनुष्याचा व ईश्वराचा संबंध वेगळा व

मनुष्यामनुष्यांचा संबंध वेगळा, त्या दोघांची सळभेसळ होता कामा नये." अशी आगरकरांची जातीधर्मनिरपेक्ष सामाजिक दृष्टी होती. व्यक्तीच्या विचार स्वातंत्र्याची व उपक्रमशिलतेची गळचेपी करणाऱ्या जुन्या धर्मकल्पना बाजूस सारुन व्यक्तीचा सर्वांगिण विकास आणि सामाजिक समता या उद्दीष्टांच्या पूर्ततेसाठी आपल्या सामाजिक जीवनाला नवे वळण लावण्याची त्यांची मनिषा होती.

आगरकरांच्या धर्मचिंतनाची चार ठळक वैशिष्टे आपल्या चटकन नजरेत भरतात. ती अशी समंजस समतोल दृष्टी, बुध्दिप्रामाण्यवाद, अज्ञेयवाद आणि उत्क्रांतिवाद.[११]

कोणाची धर्मविषयक भूमिका कशीही असली तरी त्यांनी ती मांडताना **"पराकाष्ठेच्या शांततेचा आणि समीक्षतेचे अवलंबन केले पाहिजे."** यावर आगरकरांचा कटाक्ष होता. धर्म सुधारणचा आगरकरांच्या मते सर्वोत्तम मार्ग शुध्द स्वरुपातील धर्माची लोकांना ओळख करुन देणे हाच असू शकतो.

बुध्दिप्रामाण्यवाद हा आगरकरांच्या धर्मचिंतनाचा कणा म्हणता येईल. आगरकरांचा माणसांच्या विवेकबुध्दीवर गाढा विश्वास होता. विवेकशील माणूस हाच त्यांच्या मते धर्माचा अंतिम मानदंड होता.

मनुष्याने आपल्या ज्ञानाची मर्यादा ओळखून माणसाच्या ज्ञात इतिहासाच्या व ज्ञात जाणीवांच्या परिघातच विश्वाचा व मानवी जीवनाचा विचार करणे व अनुमाने काढणेच श्रेयस्कर आहे अशी आगरकरांची भूमिका होती. आगरकरांची नीतिमीमांसा विवेकनिष्ठ अज्ञेयवादावरच आधारित होती.

काळानुरुप बदलणारी माणसाची संस्कृती व मनोवृत्ती धर्माच्या क्षेत्रातही सतत बदल घडवून आणत असते. कालपर्यंत धर्मसंगत वाटणाऱ्या गोष्टी माणसाला कालबाह्य आक्षेपार्ह आणि त्याज्य वाटू शकतात. विवेकाच्या आधारे तो तसा निर्णय घेवू शकतो. यातून धार्मिक परिवर्तन सुधारणा होते. उन्नत व शुध्द अशा धर्माचा माणसापुढील आदर्श

त्यातून साकार होवू शकतो यावर आगरकरांचा विश्वास होता. त्यांनी ज्या चिवटपणे समाजाला न रुचणाऱ्या पण पथ्यकारक असलेल्या धार्मिक सुधारणांचा पाठपुरावा केला, त्यामागे उत्क्रांती तत्त्वावरचा हा त्यांचा विश्वासच होता.[१२]

व्यक्ती व समाज :-

राजकारण, धर्मजीवन आणि कुटुंब व्यवस्था ही सामाजिक जीवनाची तीन प्रमुख अंगे होत. सुधारणेच्या प्राथमिक अवस्थेत राजकीय, सामाजिक व धार्मिक विचार आणि क्रिया एकमेकात गुंतलेल्या असतात. त्यांच्या व्यवच्छेदक सीमारेषा स्पष्टपणे निश्चित झालेल्या नसतात. पुढे उत्तरोत्तर त्यांची फारकत होऊन सामाजिक जीवनाची प्रत्येक शाखा स्वायत्त व सुसंघटित बनतते.

व्यक्तीशिवाय समाजाचे अस्तित्व संभवत नाही. व्यक्ती आणि समाज एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आगरकर हे व्यक्तीवादाचे पुरस्कर्ते होते. परंतू त्यांच्या व्यक्तीवादात आत्यंतिकतेला थारा नव्हता. उलट तो विवेकशील, वास्तवलक्षी व समाजाभिमुख होता. त्यामुळे आपल्या व्यक्तीवादी विचारांची ते मांडणी करताना समाजोन्नतीला बाधक होवू नयेत म्हणून आगरकरांनी सतत खबरदारी घेतली होती. जसजसा समाज सुधारत जातो तसतसे दैवी सामर्थ्यांचे स्तोम कमी होत जाते. मानवी प्रेरणांची प्रतिष्ठा वाढीस लागते. आपल्याप्रमाणे इतर व्यक्तीनाही जगण्याचा हक्क आहे; पाशवी बळाच्या जोरावर कुणाचेही अस्तित्व धोक्यात येऊ न देण्याची जबाबदारी समाजाची आहे, योगक्षेमासाठी एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीवर सर्वस्वी अवलंबून राहण्याची गरज पडता कामा नये इत्यादी विचार मान्यता पावणे हे 'प्रगत समाजाचे' मुख्य लक्षण आहे, असे आगरकर म्हणतात. मनुष्याच्या जीवनाची थोरवी त्यांच्या नैतिकतेत आहे आणि निवड व कृती यांचे स्वातंत्र्य असल्याखेरीज नैतिकता संभवत नाही. आपल्या अंत:करणातील उच्चतर प्रेरणांच्या व विवेकबुध्दीच्या सहाय्याने प्रत्येक व्यक्ती जेव्हा स्वयंशासित बनेल, तेव्हाच "आदर्श समाजाचे" स्वप्न साकार होईल. म्हणून समाजाचे

कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास, जेवढी बंधने अपरिहार्य आहेत, तेवढी कायम ठेऊन बाकी सर्व गोष्टीत व्यक्तीमात्रास (पुरुषास व स्त्रीस) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल तितका घ्यावयाचा हे अर्वाचीन पाश्चिमात्य सभ्यग्दृष्टीने सुधारणेचे मुख्य तत्व आहे. आणि ते आत्मसात केल्याखेरीज आपणास गत्यंतर नाही असे आगरकरांचे ठाम मत होते. या तत्वाच्या मुळाशी "मनुष्यास आपली स्थिती उत्तरोत्तर सुधारीत नेण्याची नैसर्गिक बुध्दिशक्ती आहे" असा विश्वास होता.[१३]

व्यक्तीस्वातंत्र्य हे एकदा मूल्य म्हणून स्वीकारले की, सर्वांना समान स्वातंत्र्य हा सिध्दांत ओघानेच येतो. त्यानुसार समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याला आपोआपच काही मर्यादा पडतात; आणि या मर्यादेचे व्यवस्थित पालन व्हावे याकरिता सामाजिक बंधनाची आवश्यकता उत्पन्न होते. आगरकरांनी आपल्या विचारप्रणालीत व्यक्ती स्वातंत्र्याबरोबर सामाजिक समतेचाही अंतर्भाव केला होता. "या सर्व मानवप्राणी जन्मत: सारख्या योग्यतेचे अधिकारी असून त्यांचे हक्कही एकसारखे असतात; व ती योग्यता व ते हक्क यांच्याकडे राहणे हे केवळ त्यांच्या कमी अधिक बुध्दीविकासावर व उद्योगशिलतेवर अवलंबून आहे." म्हणून व्यक्तीच्या स्वतंत्र कर्तृत्वाला जास्तीत जास्त वाव मिळाला पहिजे; तिच्या आकांक्षा आणि तिची उपक्रम क्षमता यावर कुठल्याही प्रकारचे कृत्रिम निर्बंध असता कामा नयेत अशी आगरकरांची धारणा होती. व्यक्तीस्वातंत्र्य आणि सामाजिक समता ही तत्वे परस्पर पोषक आहेत.

समाजात सत्ता व संपत्ती यांची समान विभागणी करणे हेच समाज सुधारणेचे खरे ध्येय आहे हे सांगताना आगरकर लिहतात "कित्येक जण हा स्थूल अर्थ संकुचित करुन राष्ट्राच्या राजाचे किंवा त्यातील श्रेष्ठ लोकांचे जे कल्याण ते साऱ्या राष्ट्राचे किंवा समाजाचे कल्याण असा विशिष्ट अर्थ करतात. अशा अर्थानुरोधाने ज्या समाजात वर्तन होत असते, त्यात एका पक्षाकडे संपत्ती आणि सत्ता व दुसऱ्या पक्षाकडे दारिद्र्य आणि दास्य अशी वाटणी झालेली असते. अशा समाजातील सामान्य लोकांस शुध्द वन्यावस्थेतील सुखाहून

अधिक सुख होत असेल असे जरी मानत आले तरी त्यात त्यांचे पूर्ण समाधान होण्यासारखे ते नसलेच पाहिजे हे उघड आहे. पण मनुष्य समाज स्थापू लागल्याबरोबर त्यात जी शारिरीक किंवा मानसिक सामर्थ्याने इतरांपेक्षा श्रेष्ठ असतील त्यांच्या हाती सत्ता व बहुतेकांच्या श्रमाचे फळ जाणे अगदी स्वाभाविक आहे. तेंव्हा समाजाच्या प्रथमावस्थेत जे सामर्थ्यवान असतील त्यांच्या हाती सत्ता असणे व दुर्बलांना दास्य करावे लागणे, हे ज्या दिशेकडे उतार असेल त्या दिशेकडे पाण्याचा ओघ जाण्यासारखा होय. हा ओघ बंद करुन सर्वास सारखे, निदान होईल तितके सारखे,सुख मिळण्याची व्यवस्था होत जाणे म्हणजे सुधारणा होत जाणे असे म्हणण्यास हरकत नाही." [१४] ज्यांच्या हाती राज्यसूत्रे असतील त्यांनी रात्रदिवस सरकारी अंमल अगदी बेतापुरता चालवावयाचा असा निश्चय केला पाहिजे. ज्या देशातील लोक चिखलात रुतलेल्या गाईप्रमाणे हातपाय हालविण्यास अगदी असमर्थ झाले असतील अशास गाळातून बाहेर पडून दोन पावले टाकता येण्यापुरती मदत सरकारने अवश्य केली पहिजे; पण त्यापुढे त्यांना आपल्या पायांनी चालू न देणे म्हणजे त्यास निरंतर पंगू करुन ठेऊन त्यांचे आणि त्या बरोबर आपलेही नुकसान करुन घेणे होय हे अंमलदारांनी कधीही विसरता कामा नये."[१५] सामाजिक संनिधानातील परायत्तता कमी कमी होवून स्वायत्ततेची व्याप्ती वाढत जाणे हे समाजाच्या प्रगतिशिलतेचे द्योतक आहे अशी आगरकरांची धारणा होती.

मनुष्याच्या निरनिराळ्या समूहाला टोळी, कुटुंब, जात, राष्ट्र इत्यादी संज्ञा काही विशेष कारणांनी व विशिष्ट परिस्थितीत प्राप्त झालेल्या आहेत. आपल्या समूहातील सर्वांचे रक्षण करण्याची धमक ज्यांच्या अंगी असेल,असा बलिष्ठ व कर्तबगार व्यक्तीकडे त्या त्या समूहाचे प्रमुखपद जात असे. बुध्दीमत्ता, शरिरबळ, ऐश्वर्य, वेधकता, करारीपणा इत्यादी गुणाबद्दल मनुष्याच्या अंत:करणात स्वभावच पुज्यबुध्दीची बीजे असतात. त्यामुळे राजा हा ईश्वरी अंश आहे, अशा कल्पना पिढ्यानपिढया संस्कारातून बळकवतात. अशा स्थितीत सत्ताधारी वर्ग बेजबाबदार बनून अनिर्बंधपणे अधिकार गाजवू

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

लागतो. त्यावेळी शास्त्याचे दृष्ट वर्तन आणि त्यामुळे मनास व शरिरास वारंवार होणारी पिडा यामुळे अत्यंत सहनशील मनुष्याची ही नैसर्गिक स्वातंत्र्यप्रियता जागी होते या स्वातंत्र्य कक्षेने राज्यकर्त्यांची जुलम जबरदस्ती याविरुध्द बंडखोरपणाच्या उर्मीतून सत्तांतराची प्रक्रिया सुरु होते. मात्र काही झाले तरी राज्यसत्ता एकदम सामान्य जनतेच्या हाती येत नाही. अनियंत्रित राजसत्तेचा जुलूम गरीब प्रजेप्रमाणे श्रीमंत कुळावरही चालू असतो. प्रथमत: राजा व श्रीमंत उमराव यांच्यातील झगड्यास प्रारंभ होतो. त्यांचे पर्यावसन कुठे राजसत्ता संपुष्टात येण्यात तर कुठे ती वृध्दींगत होण्यात होते. जेथे ती सत्ता राजाकडून निघून श्रीमंत कुळाकडे येते तेथे ती कालांतराने सर्वसामान्य लोकांकडे कोणत्या तरी रुपाने गेल्याशिवाय राहत नाही. **"एकसत्तात्मक, अनेक सत्तात्मक व सर्वसत्तात्मक अशी राजकीय कल्पनेची वाढ आहे."** सर्वसामान्य लोकांत विद्येचा व संपत्तीचा थोडा बहुत प्रसार होऊ लागला म्हणजे सामाजिक जीवनातील सक्तीचे साम्राज्य लयास जाऊन तेथे संमत्ती तत्वाची स्थापना होते आणि धार्मिक, राजकीय व आर्थिक व्यवहारास समतेचे वळण लागते.

राजकीय घडामोडीत जी राष्ट्रे सातत्याने अग्रभागी राहतील, त्या सर्वात हर एक प्रकारचा राजकीय व्यवहार, "अगदी सौम्य अशा लोक सत्तात्मक राजसभेकडून" होत जाईल. प्रथम युरोपातील देशांत ही राज्यपध्दती दृढमुल होईल. त्यानंतर राजकीय सुधारणेचे हे लोण पाश्चात्य संस्कृतीच्या प्रसाराबरोबर आशिया खंडात जाऊन पोचल्याखेरीज राहणार नाही. आशियाई राष्ट्रातील लोक जागृत होवून त्यांची स्वातंत्रेच्छा प्रबळ झाली तेथील परंपरागत अनियंत्रित राजेशाहीचा अस्त होऊन त्या जागी लोकशाही राजवट अस्तित्वात येईल. इतरत्रही या घटनेचे पडसाद उमटतील. कालांतराने पृथ्वीवरील सर्व लोकसत्ताक राष्ट्राचे एक राष्ट्र बनेल. सर्व जग म्हणजे एक राष्ट्र हे तत्त्वचिंतकाचे स्वप्न कधी साकार होईल हे सांगता येणार नाही. सध्या तरी राष्ट्रनिष्ठा आणि लोकसत्ता ही दोन तत्त्वे पुष्कळच मान्यता पावली आहेत; आणि सर्वच देशांच्या राजकीय जीवनावर त्यांचा

दिर्घकाळ प्रभाव पडत राहील अशी चिन्हे दिसत आहेत. असा आगरकरांच्या प्रतिपादनाचा प्रामुख्याने रोख आहे.[१६]

"**राजकीय स्वातंत्र्य**" हे आगरकरांच्या मते, "**राष्ट्रीय जीवनाचे चैतन्यसारतत्व**" आहे. आगरकर हे पक्के स्वराज्यवादी होते. आगरकरांना रुढीवादाच्या गुलामगिरीतून आपल्या लोकांना मुक्त करायचे होते, म्हणून त्यांनी व्यक्तीस्वातंत्र्याच्या तत्वांवर नि:शंकपणे भर दिला; पण त्याचा आशय विशद करुन सांगताना त्यांनी ठोकळेबाज पुस्तकी पध्दतीचा अवलंब केला नाही. आपल्या देशातील परिस्थितीचा त्यांना कधीच विसर पडला नाही. सामाजिक सुधारणेचे कार्य पुढे रेटताना तत्त्वनिष्ठेइतकीच तारतम्य राखण्याचीही गरज आहे. यांची त्यांना जाणीव होती. कोरड्या अमूर्त तत्त्वचर्चेला प्राधान्य न देता त्यांनी सामाजिक जीवनातील जिव्हाळ्याचे प्रश्न घेऊन त्यांची सांगोपांग छाननी केली; आणि त्यांच्या अनुषंगाने आपल्या लोकांना आधुनिक विचारसरणीची ओळख करुन दिली.

आगरकरांनी जीवन कलहाचा सिध्दांत मांडून संघर्षाशिवाय किंवा विचार कलहाशिवाय माणसांची प्रगती अशक्य आहे असा विचार मांडला त्याचप्रमाणे त्यांनी शास्त्रीय दृष्टीकोनातून धर्माच्या उत्पत्तीची मीमांसा केली. आगरकरांच्या मते, जीवन कलहातून जसजसा माणसांचा विकास होतो तसतशी माणसांची धर्मविषयक धारणा जास्त प्रगल्भ बनते. सामाजिक विकासाचा परिणाम राजकीय विकासावरही होतो जसजसा समाज प्रगती करतो, जास्त उदार मूल्यांवर आधारलेल्या सामाजिक संस्था स्थापन करतो. स्वातंत्र्य, समता व परस्पर संमती याला महत्व देतो तसतसा राजकीय दृष्ट्या तो प्रगती करतो. त्यांच्या मते, राजकीय प्रगतीचे खरे वैशिष्ट्य किंवा राजकीय परिस्थितीचे खरे गमक देशामध्ये सौम्यपणे स्थापन राज्य करणारी लोकशाही राजवट स्थापन करणे हा होता. आजच्या राज्यशास्त्रज्ञापेक्षा या विषयीचे आगरकरांचे राजकीय विचार फारसे वेगळे नव्हते हे वरील चर्चेवरुन स्पष्ट व्हायला हरकत नाही.

– : संदर्भ सूची :–

१. सरदार गं.बा.
आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार (प्रथमावृत्ती)
व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७५, पृष्ठ नं.२३

२. नातू म.ग./देशपांडे दि.य. (सं)
आगरकर वाङ्.मय, भाग दोन (प्रथमावृत्ती)
प्रकाशक: महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई, १९८५, पृष्ठ नं.२४९

३. चौसाळकर अशोक – आगरकरांचे सामाजिकशास्त्र
आजचा सुधारक, आगरकर विशेषांक,
जून–जुलै १९९५, पृष्ठ नं.१०९

४. चौसाळकर अशोक
आगरकरांचे राजकीय विचार
लोकवाङ्.मय गृह,मुंबई २००५, पृष्ठ नं.९

५. भोळे भा.ल.
आगरकरांचे धर्मचिंतन
लोकवाङ्.मय गृह, मुंबई २००५, पृष्ठ नं. १८

६. जोशी लक्ष्मणशास्त्री
अध्यात्मवादी टिळक व भौतिकवादी आगरकर
आजचा सुधारक डिसेंबर २००६, पृष्ठ नं.४३२

७. नातू म.ग./देशपांडे दि.य. (सं)
आगरकर वाङ्.मय, भाग दोन (प्रथमावृत्ती)
प्रकाशक: महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई, १९८५, पृष्ठ नं.१७६

८. सुमंत यशवंत–आगरकर प्रणीत धर्मचिकित्सेचा आशय
आजचा सुधारक – आगरकर विशेषांक
जून–जुलै १९९५, पृष्ठ नं.९६

९. जावडेकर आचार्य
आधुनिक भारत
कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे १९३८, पृष्ठ नं. २२२

१०. जावडेकर आचार्य
आधुनिक भारत
कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे १९३८, पृष्ठ नं. २२१

११. भोळे भा.ल.
आगरकरांचे धर्मचिंतन
लोकवाङ्.मय गृह, मुंबइ २००५, पृष्ठ नं.१३

१२. भोळे भा.ल.
आगरकरांचे धर्मचिंतन
लोकवाङ्.मय गृह, मुंबइ २००५, पृष्ठ नं.१९

१३. सरदार गं.बा.
आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार (प्रथमावृत्ती)
व्हीनस प्रकाशन, पुणे १९७५, पृष्ठ नं. ७७

१४. जावडेकर आचार्य
आधुनिक भारत
कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे १९३८, पृष्ठ नं.२१७

१५. आळतेकर मा.दा. (सं)
संपूर्ण आगरकर भाग दोन
मॉडर्न बुक डेपो, पुणे १९४७, पृष्ठ नं.११५

१६. सरदार गं.बा.
आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार (प्रथमावृत्ती)
व्हीनस प्रकाशन, पुणे १९७५, पृष्ठ नं. १४३